# चैतन्य लहरी

मे - जून २००८





## आपल्याला लोकांपर्यंत पोहोचायचे आहे...

एक महिला होती. तिला आत्म साक्षात्कार पाहिजे होता. ती आली आणि तिला मिळाला. तिला खूप चांगल्या तऱ्हेने मिळाला. असे कितीतरी लोक आहेत जे त्याच्या शोधात आहे. तुम्हाला त्यांच्याशी संपर्क करून त्यांना पुढे आणले पाहिजे.

मला प्रवास करण्यामध्ये कोणताही त्रास होत नाही. मी इतक्या दूर भारतामधून आले आहे. आणि तुम्ही लोक माझ्या सोयी-सुविधांकडे खूपच लक्ष देता. बघा, तुम्ही कोणी ही असा, तुम्ही कुठेही कार्यक्रमाचे आयोजन करा तिथे मी जाईन. जोपर्यंत शक्य होईल तोपर्यंत मी अवश्य जाईन.

आजकाल तर बऱ्याच सोयी उपलब्ध झाल्या आहेत. पण जेंव्हा मी गावांमधून काम करत होते तेंव्हा मी बैलगाडीमधून जात होते. आपल्याजवळ याचे फोटो असतील. तुम्ही समजू शकता की बैलगाडी मधून लांबचा प्रवास करणे कसे असते. मला माहीत होते की मला हे सर्व करायचे आहे. सहजयोगींना प्राप्त करण्यासाठी मला याप्रकारे काम करावेच लागणार होते. यासाठी माझी पूर्ण तयारी होती. मला आतून कधीही, कोणत्याही प्रकारचा थकवा जाणवला नाही, कधीच नाही. याव्यतिरिक्त आपल्या सर्वांना भेटल्यामुळे मला खुप आनंद मिळतो.

**श्री माताजी निर्मला देवी, सिडनी**

◆ प्रकाशक ◆

**निर्मल ट्रान्सफॉर्मेशन प्रा. लि.**

प्लॉट नं.८, चंद्रगुप्त हाउसिंग सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे - ४११ ०२९
फोन : ०२०- २५२८६७२०, २५२८५२३२

# अनुक्रमणिका

❑ **कार्तिकेय पूजा** .......................................... ४

इतके वर्ष महाराष्ट्र ही माझी मायभूमी. ही माझी मायभूमी. शिवाजी महाराजांनी स्वधर्म जागवावा म्हणून सांगितलं होतं आणि मग ज्ञानेश्वरांनी आधी सांगितलं होतं की 'विश्व स्वधर्म सूर्ये पाहो'

❑ **विशेष उत्तरदायित्त्व** .......................................... ११

आपण विशेष लोक आहात ज्यांनी या धरतीवर जन्म घेतला आहे. आपल्यावर या संपूर्ण जगाविषयी एक जबाबदारी आहे.

❑ **तुम्ही क्षमा केली पाहिजे (ईस्टर पूजा)** .......................... १२

आम्ही सर्वसाधारण मनुष्य आहोत आणि जर आम्ही चुका केल्याच तर लोक रागावतील आणि नाराज होतील. परंतु तुमच्यासाठी सगळ्यात चांगली गोष्ट आहे ती म्हणजे क्षमा करणे.

❑ **श्री भैरवनाथ पूजा** .......................................... १६

श्री भैरवनाथ आपल्या हातात प्रकाशाचा दिवा घेवून ईडा नाडीमधे वर-खाली संचार करून आपल्यासाठी मार्ग प्रकाशित करतात. ज्यामुळे आपण पाहू शकाल की नकारात्मक काहीच नाही.

❑ **गुरूपूजा** .......................................... १८

तुमच्यामध्ये जे काही ऐश्वर्य जन्मापासून सिद्ध करुन ठेवले आहे त्याचे ज्ञान गुरु आपल्याला करुन देतो.

❑ **प्रश्नोत्तरे** .......................................... २१

# कार्तिकेय पूजा

## मुंबई, २१/१२/१९९६



आज आपण सर्वांनी श्री महालक्ष्मीची पूजा करावी अशी लोकांनी इच्छा प्रदर्शित केली आहे पण या महाराष्ट्रात महालक्ष्मीची पूजा तर सतत चालू आहे आणि स्वत: त्यांनी इथे प्रकटीकरण केले आहे, पण माझ्या मते इथे सर्वांना कार्तिकेयाबद्दल सांगावे अशी आंतरिक इच्छा झाली कारण त्यांनी या महाराष्ट्रातच जन्म घेतला आणि ते म्हणजेच ज्ञानेश्वर होते. आजपर्यंत मी सांगितले नाही कारण महाराष्ट्रीयन लोकांच्या डोक्यात काही गोष्ट घुसत नाही. स्वत: साक्षात कार्तिकियाने या महाराष्ट्रात जन्म घेतला आणि इतकी सुंदर ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव असे दोन मोठे फारच महान असे ग्रंथ लिहिले. श्री ज्ञानेश्वर म्हणजे कार्तिकियच होते कां, हे जर तुम्ही व्हायब्रेशन्सवर बघू शकाल, तर एकदम महासागरात आनंदाच्या लहरीत तुम्ही स्वत: ला शोधू शकाल. एवढी मोठी गोष्ट मी महाराष्ट्रात सांगितली नाही. त्याला कारण महाराष्ट्रीयन लोकांची प्रवृत्ती झाली आहे. कदाचित आपल्याकडे राजकारणी लोक पूर्वी इतके भयंकर झाले. त्यांचा भयंकरपणा व घाणेरडेपणा महाराष्ट्रात पसरला असेल आणि कार्तिकेय हे महाराष्ट्राचे. आम्ही कार्तिकेय असे समजणे म्हणजे अगदी व्यवस्थित साधं महाराष्ट्रीयन डोकं आहे. आम्ही काहीतरी शिष्ट. आता यांनी सांगितली खरी गोष्ट आहे की चाळीस आय.ए.एस. ऑफिसर्स आले होते आणि मी येतांना बघितलं तिथे पोलिसचे तीन घोडेस्वार उभे होते. म्हटलं 'हे कोण आले होते?' तर म्हणे स्वत: चीफ सेक्रेटरी आले होते. तिथल्या गव्हर्नरनी सुद्धा मला पाचारण केले की, 'माताजी, मी जर तुमचे पाचारण केले नाही तर लोक मला उचलून फेकतील.' अशी तिथल्या लोकांची जागृती. तिथे ज्ञानेश्वरांनी जन्म घेतला नाही. फक्त या महाराष्ट्रात का जन्म घेतला ते आता मला लक्षात येतंय. तेवीस वर्षातच 'नको रे बाबा हा महाराष्ट्र' म्हणून त्यांनी समाधी घेतली.

जितकं संतांना महाराष्ट्रात छळलं गेलं तितकं कुठेही, कोणत्याही संतांना छळलं गेलं नाही. याच्यात म्हणजे मर्दुमकी आहे आमच्याकडे. परत ते मेल्यावर मात्र त्यांची देवळं बांधायची, टाळ कुटत बसायचं, नुसते रिकामटेकडेपणाचे धंदे. इतके वर्ष महाराष्ट्र ही माझी मायभूमी. ही माझी मायभूमी. शिवाजी महाराजांनी स्वधर्म जागवावा म्हणून सांगितलं होतं आणि मग ज्ञानेश्वरांनी आधी सांगितलं होतं की 'विश्व स्वधर्म सूर्ये पाहो' तेव्हा शिवाजी महाराजांनी ते शब्द म्हटले आणि तेच कार्य आता आम्ही बघतो की आम्ही विश्व, स्वधर्म, सूर्य

जागृत झाला पाहिजे आणि तो आधी महाराष्ट्रात झाला पाहिजे कारण हे ज्ञानेश्वरांनी इथे सगळ्यांना सांगितले. काल मी बोलले महाराष्ट्राबद्दल त्याचं वाईट वाटून घेऊ नये. उलट माताजी याच्याबद्दल बोलत होत्या, त्याच्याबद्दल बोलत होत्या असा विचार करायचा. स्वत:कडे लक्ष घालावे त्याला introspection असा शब्द त्यांनी वापरला. माताजीच म्हणाल्या की इतके साधु संत झालेच नाही. म्हणजे तुम्ही काही साधु संत नाही. जसं डबक्यामध्ये एखाद कमळाचं फुल यावं आणि त्यातल्या बेडकांनी म्हणायचं की वा! वा! या कमळाच्या फुलाच्या दबावात आम्ही केवढे मोठे. तशातला प्रकार जास्त आहे आपल्या महाराष्ट्रात हे लक्षात घेतलं पाहिजे. जे प्रकार मी इथे पाहिले, कुठेही सर्व जगात



नाही. पहिलं म्हणजे भांडकुदळपणा. मला इतका कंटाळा येतो कधी कधी की मी म्हटलं एक पूजा घेईन मी फक्त बस त्याच्या पुढे नको. इतका भांडकुदळपणा.

आता इथे इतकं सुंदर गणपतीपुळ्याला आम्ही आश्रम बांधला त्याच्या मागे हात धुऊन लागले. इतके गलिच्छ लोकं आहेत. काही समजतच नाही यांना. पण आम्ही संतांच्या भूमीत राहणारे, आमच्याकडे अष्टविनायक, आमच्याकडे साडेतीन देवींचे प्रगटीकरण ते मला वाटतं की एवढ्यासाठी की घाणीत स्वच्छता आणण्यासाठी या लोकांनी हिम्मत केली असेल. तशी आम्ही सुद्धा हिम्मत केली. पण आता एकएक प्रकार बघते तर मला आश्चर्य वाटतं. एका गृहस्थाने माझी परवानगी न घेता, मी त्याचं तोंड सुद्धा कधी पाहिलेलं नाही त्याने व्यवस्थित मिरवणूक काढली. दुसरे गृहस्थ माझ्या नावाने स्वत: ची पूजा करून घेतात. असे शहाणपणाचे धंदे कुठेच मी पाहिले नाही. अहो, मद्रासला सुद्धा नाही पाहिलं, बंगालमध्ये पाहिलं नाही. देवाची भीती नाही. काहीही करायचं. इतके वाईट लोक होते. जे सहजयोग पाळू शकत होते त्यांना म्हटलं तुम्ही सहजयोगात रहायचं नाही सध्या. सहजयोगात राहून स्वत:ची स्थिती नीट करा. झालं, माताजी प्रेमाच्या गोष्टी सांगतात आणि मग सगळ्यांवर का रागवतात? मी आई आहे. जे तुमच्यासाठी चांगलं आहे ते सांगितलंच पाहिजे आणि ते मी सांगेन. पण कुठे कुठे सांगावच लागत नाही, गरजच नाही त्याची. अत्यंत शिष्ट लोकं आणि ते जे म्हणाले ते खरं आहे पुढे पुढे करणे. मुद्दामहून मी एक फूलं घेऊन मी ठाण्याहून इथे आलो. मुद्दामहून माताजींच्यासाठी. ते मी स्वत:च माताजींना देणार. मुद्दामहून. पागलखान्यातून आलेले दिसतात. तेव्हा का असं आहे महाराष्ट्रात? ते मला समजत नाही. संत साधु झाले म्हणून ही पवित्र भूमी. इथे अष्टविनायक म्हणून अगदी पवित्र भूमी आहे, आणि त्याच्यावर साडेतीन देवींचे प्रगटीकरण म्हणजे ही परम पवित्र भूमी. या भूमीत असले घाणेरडे प्रकार का होतात? एक दुसरे गृहस्थ कोणीतरी निघाले. त्यांना भूतबाधा प्रकार बरेच झाल्यामुळे त्यांना सांगितलं की बाबा तुम्ही सहजयोगातून जा. तर त्यांनी दुसराच सहजयोग काढला आहे स्वत:चा. माझ्यात जे दोष आहे, माझ्यात जे वाईट आहे ते काढायचं नाही. उलट मी काहीतरी विशेष, आता मी काहीतरी दाखवतो. म्हणजे इथपर्यंत की त्यांची बायको सगळ्यांना सांगायची की आमचे हे माताजींपेक्षा फार वर आहेत. वर आहेत की खाली देवाला ठाऊक! असले अनेकविध प्रकार ऐकून मी आश्चर्यचकित झाले. हा असला प्रकार सहजयोगात कुठेही कुठेही झालेला नाही. परत

आपली मराठी वर्तमानपत्रे. त्यापेक्षा ती हिंदी बरी, इंग्लिश बरी. काहीही भरकटायचं, काहीही लिहायचं. काहीही करायचं. भांडकुदळपणा हा पहिला स्वभाव आहे महाराष्ट्राचा. बरं झालं भांडकुदळपणा हा तुमचा स्वभाव आहे. काहीही असलं तरी आता सहजयोगात उतरलाय. हेवेदावे इतके, भांडणं इतकी, कुणाला पाडायला, शिष्टपणा इतका तर आम्ही म्हणे जुने सहजयोगी. हे नवीन. त्यांना काही येतच नाही. हळूहळू उत्तर हिंदुस्थानातील लोक सुद्धा सहजयोगात येऊ लागले आहेत. पण इथला चमत्कारिकपणा पाहून तेही परतायला लागलेत.

मी जेव्हा पुण्याला गेले तिथे पंजाबी लोक आले होते सहजयोगाला. ते म्हणे 'माताजी, या महाराष्ट्रीयन कुचक्या लोकांना घेऊन तुम्ही काय चालवलयं. ते कुचकट लोक आहेत.' मला मोठा राग आला म्हटलं, 'बाबा, असं कसं म्हणतात. यांना कुचकट म्हणतात. ही काय बोलायची पद्धत झाली? तुम्ही स्वत:ला समजता काय? तुम्ही पंजाबी म्हणजे... पण आज ते आठ दहा लोक पक्के सहजयोगी बनलेले आहेत.

दिल्लीला आश्रम बांधला. तर तुम्हाला आश्चर्य वाटेल ध्यानाला रोज सकाळी ऑफिसला जायच्या आधी मोटारीतून येऊन नाहीतर बसने येऊन निदान शंभर माणसं रोज ध्यानाला बसतात. बाकी सर्व सुंदर आहे. एवढ्या आपल्याजवळ वस्तू आहेत सुंदर. आईची शोभा आहे. समया लावण्यात फार हुशार. सगळं करण्यात आपण फार हुशार आहोत. पण आतला जो दिवा तो कधी पेटवणार? आतला दिवा आधी पेटवू या. आम्ही किती गहन आहोत ते बघण्यासाठी आतला दिवा आधी पेटवून घ्या.

जे आत्ता आपल्याला सांगितलं ते मीच त्याला सांगितलं तूच सांग म्हणून कारण मला बोलवत नाही या गोष्टी. आता हे सहजयोगात उतरलेले लोक दारू प्यायचे, ड्रग घ्यायचे, सगळे धंदे आणि कुठल्या कुठे पोहोचले आणि महाराष्ट्रातील लोक आपापसात हमरीतुमरीवर येतात म्हणजे काय? म्हणे माताजी आमच्यावर रागवतात. रागवणार नाही तर काय तुमच्या गळ्यात हार घालायचे? आपापसात भांडण करण्यात एवढे पटाईत लोक आहेत, मग रिकामटेकडेपणा पण फार. इथे असं करतात, ते तसं करतात. करू देत. रिकामटेकडेपणाचे धंदे फार. मग काही नाही सुचलं तर आजकाल माताजी पैसे-बिसे देत नाहीत म्हणून आपल्याला जास्तीचे पैसे द्यावे लागतात. अहो मीच सगळ्या गोष्टींचे पैसे देतीये. तुमच्या जेवणाचे, खाण्याचे, पिण्याचे. सगळे देऊन पाहिले. तर आता काही नाही तर अशा गोष्टी बोलायच्या. मी काय या राजकारणी लोकांसारखी आहे की काय? मग म्हणायचे की माताजी इकडे भूकंप का होतात? अमुक का होतं, तमुक का होतं?

इतके दारूडे महाराष्ट्रात आहेत इतके मी कुठेही पाहिले नाहीत. रस्त्यावर दारू पिऊन फिरणारे महाराष्ट्रात किती लोक आहेत तुम्ही सांगा? दिल्लीला तुम्हाला असे रस्त्यात एक दिसणार नाही. एकसुद्धा. अहो, परदेशात मी कधी पाहिले नाही. या महाराष्ट्रात तुम्ही कुठे बाहेर जा दारू पिऊन जा. हे सुरुवातीपासून चालू आहे बरेच वर्ष झालं.

मी राहुरीला गेले होते एकदा, तर रस्ता असा वर चढत गेला आणि मोठा रस्ता आडवा होता. तिथे जाऊन मी गाडी थांबवल्यावर बघते तर काय ढेकणासारखे पटापट मरत होते तिथे. म्हटलं कॉलरा झाला की काय? पांढरी टोपी मात्र लावायची. पांढरे सदरे, पांढरी विजार घालून खालून वर येऊन ढेकणासारखे पटापट पडले. म्हटलं अहो, झालं काय? तिकडे म्हणे इंदिरा नगरी आहे. मग पुढे. तिथे म्हणे दारू मिळते स्वस्त. दारू पिऊन तिथून वर यायचे आणि पटापट मरायचे. इतके लोक इथे दारू पितात की ऑफिसर्स. दिल्लीला तुम्ही गेले तर तिथे दारू पित नाहीत. फार कमी लोक. पुष्कळ लोक जिथे दारू असेल तिथे जात पण नाही. पण इथल्या प्रत्येक पार्टीत तुम्ही जा, कुठेही जा पण दारू पिऊन झिंगले नाहीत तर ते महाराष्ट्रीयन कसले. अहो, महाराष्ट्रीयन लोक दारू पितात. आम्हाला लहानपणापासून दारू म्हणजे काय हे माहीत नाही. त्याचा रंगसुद्धा माहीत नाही. बरं कोणाला काही म्हटलं तर ते म्हणतात बघा ते होते सत्तर वर्षांचे आणि तरी दारू पित होते. म्हटलं असं का? आता त्यांचा पुतळा उभारा तुम्ही लोकं. त्या लायकीत आपण आलो आहोत आता का? दारूचे गुत्ते बंद करण्यासाठी आम्ही लहानपणी सात वर्षांचे असतांना भांडणं केली होती. तर आता गुत्ते सोडा. इथे आता कितीतरी लोक असे जमा झाले आहेत की त्यांना आता दारूशिवाय होत नाही. दारूच्या विरूद्ध आता बोललं की लागले सगळे दारूवाले माझ्या मागे हात धुवून. कोणाला काही बोलायची सोय नाही. हेच ते वर्तमानपत्रकार, हेच ते इथले सगळे धंदे करणारे लोकं. आश्चर्याची गोष्ट आहे.

लखनौसारख्या ठिकाणी वाजिद अली शहा सारखा मनुष्य, नवाब होता. तिथल्या लोकांमध्ये इतकी सौम्यता. तशी भाषा नम्र आहे म्हणा. इतकी नम्रता, इतकं सौजन्य, मला आश्चर्य वाटलं. याचं वाईट सांग, त्याचं वाईट सांग. मला पत्रावर पत्र इतकी घाणेरडी पत्र लिहितात. प्रत्येकाच्या चरित्राबद्दल अमुक तमुक. मला अगदी कंटाळा आला. महाराष्ट्रातून पत्र आलं की म्हणते चला घाला चुलीत. आता त्या ज्ञानदेवांच्या समोर काय म्हणू. स्वत: ते तेविसाव्या वर्षी तुम्हा सर्वांना नमस्कार करून गेले. त्यांनी कुणालाही क्रिटीसाईज नाही केलं. त्यांनी तिथली (वरची) गोष्ट सांगितली. त्यांनी त्या स्थितीतल्या लोकांची गोष्ट सांगितली. ते यांच्या डोक्यात कुठून येणार? या महाराष्ट्रीयन लोकांच्या डोक्यात येण्यासारखं नाही.

असं मी म्हणणार नाही की महाराष्ट्रात लोक मिळाले नाही मला. पण ज्या मानाने मी इथं मेहनत घेतली आणि ज्या मानाने एवढा हा

अफाट हा देश महाराष्ट्र त्याच्यात अजून पुष्कळ व्हायला पाहिजे. एक तर की मी मुद्दामहून आलो. कशाला आले? कुणी सांगितलं यायला? मुळीच येऊ नये. मग मी जर येत असले तर माझ्या दर्शनाच्या वेळी स्वत:चेच दर्शन द्यायला पाहिजे. मग धक्का-धक्की, पुढे या. पुढे येऊन मलाच त्यांचे भयंकर चेहरे दिसले पाहिजेत. तुम्ही कितीही म्हटलं तरी आपल्याला अजून पुष्कळ शिकायचं आहे हे लक्षात घेतलं पाहिजे आणि ती आणबाण तानाजीची सोडा. ते कुठे गेले मला समजतच नाही. पण निदान नम्रता तर पाहिजे की आम्हाला मिळवायचयं माताजी. आम्हाला उठायचयं वर. कुठयं ते संत साधु? परत जिथे तिथे. मी तर म्हणते की ब्राह्मणांचे कर्दनकाळ सगळे इथेच हजर झालेत कारण हे गुरू, ते गुरू, ते गुरू, ते गुरू आणि प्रस्थ. भलत्या लोकांचे प्रस्थ करायचे असेल तर एकतर अमेरिकेत तरी करा किंवा महाराष्ट्रात तरी करवा. इतके महामूर्ख आहेत की अजून हे ही माहीत नाही खरं काय आणि खोटं काय. तुम्ही हे लोकांना सांगायला पाहिजे जाऊन. महाराष्ट्रातील लोकांना जाऊन सांगायला पाहिजे की खरं आणि खोटं हे सुद्धा जर तुम्हाला कळलं नाही तर काय कामाचे तुम्ही? आज मी एवढ्यासाठी सांगते की जर तुम्ही सच्चे सहजयोगी असाल तर आम्ही महाराष्ट्रीयन आणि ज्ञानेश्वरांचे आम्ही नातलग, कुठेही गेले की अहो ते आमचे पूर्वज, आम्ही त्यांचे वंशज. असं का, बरं! दिसतयं.

आणि मराठी पत्रिका वाचूच नका. उपटसुंभ आहेत सगळे. काही माहीत नाही. काय लिहायचे, काय नाही लिहायचे, लोकांना कोणतं पोषक होईल, कोणतं ठीक होईल. कबूल एक-दोन भामटे तुमच्या इथे आले, राजकारणात आले, पण तुम्ही सगळेच तसे होणार आहात का?

आता सगळ्यांना, सगळ्या सहजयोग्यांना माझी विनंती आहे की आपापसात वाद-विवाद करणे सोडा आणि जे लोक सहजयोग सोडून गेले, असे जेवढे लोकं आहेत त्या लोकांकडे बघायचं नाही. त्यांचा आमचा काही संबंध नाही. परवा एक आले होते भेटायला मला. त्यांच्या डोक्यात मोठे मोठे टेंगळं आहेत. म्हटलं झालं काय? माताजी, आता मी मरतोय. म्हटलं झालं काय? मी ते सहजयोगी होते ना तुमचे, त्यांच्याकडे गेलो होतो. कशाला गेले होते? तुमच्यासाठी व्यवस्थित सेंटर्स आहेत तिथे जा. आता कोणीही, कोणाच्या सेंटर मध्ये इंटरफिअरन्स करू नये. मला प्रत्येकाचं बघायचयं कसं काय करतात. कुणीही मध्ये बोलू नये. आता मी हेच सगळ्यांना सांगणार आहे. लोक मला सांगायला लागले की इकडे तिकडे लोक बोलतात म्हणून घोटाळे. जिथे जो सेंटर चालवेल तोच त्याचा मुख्य, तोच त्याचा लिडर. परत आपल्या लिडरच्या विरूद्ध काही लिहून पाठवलं तर तुम्हाला सहजयोगातून मी काढून टाकेन. ख्रिस्तांनी याला 'मरमरींग सोल' म्हंटले आहे. बाष्कळ गोष्टी करत बसायच्या. पूर्वी देवळात बायका वाती करत बसायच्या तेंव्हा म्हणत असत, 'आजीबाई बसल्यात वाती वळत.' पण आता तरूण लोक सुद्धा हेच धंदे करतात म्हणजे काय म्हणायचं? एकाने दुसऱ्याच्या विरूद्ध बोलणं किंवा हे असं का करतात, तसं का करतात? असा ऊहापोह करायला तुम्हाला इच्छा तरी कशी होते? मी तुम्हाला तिथे न्यायचं म्हणतेय. त्या संत पदाची मी तुम्हाला एक विशेष देणगी देणार आहे. दिली आहे. पण तुम्ही संतांसारखे वागले पाहिजे.

काल मी जरा बोलले वारकरी लोकांबद्दल. हे अनेक वर्षांपासून सांगायचे



सगळ्या सहजयोग्यांना माझी विनंती आहे की आपापसात वाद-विवाद करणे सोडा

होते पण म्हंटले नाही. भलत्या ठिकाणी श्रद्धा ठेवणे हे महाराष्ट्रीयन लोकांचे वैशिष्ट्य आहे. असेच अमेरिकन्स. मी अमेरिकन्सना नेहमी म्हणते की त्यांच्यामध्ये अजून मॅच्यूरिटी नाहीये. प्रगल्भता नाही. पण इथे तर चांगले परिपक्व लोक रहातात. या परिपक्व लोकांना झालंय काय?

तेंव्हा आजची पूजा व आजची वेळ मी सुरूवातीलाच सांगते. ज्या भूमीवर तुम्ही इथे बसले आहात तिथे रक्त सांडलंय संतांनी आणि तुम्हाला संत होणे काही कठीण नाही कारण म्हणूनच तुम्ही इथे जन्मले आहात. हे माहीत झालं, पण अनुभव आहे.ते ही जरी असले तरी 'आम्ही सहजयोगी' म्हणून तुम्ही मिश्यांवर ताव दिला तर तुम्ही कसले हो सहजयोगी. ही अशी भाषा. मराठीसारखी आध्यात्मिक भाषा नाही. महाराष्ट्रात झाले ते एवढं अध्यात्म. अहो, काय त्याची महती! गावी तेवढी थोडी आणि तुम्ही याच्यात जन्माला आले ते पुण्याई शिवाय का? पण ती वाया गेली. मी काय ज्ञानेश्वरांसारखी समाधी घेतली नाही आणि एवढे सगळे झाल्यावरसुद्धा 'अति शहाणे त्याचे बैलच रिकामे' हे आहे बरे.

म्हणे आम्ही अंधश्रद्धा निर्मूलन करतो. काल मी सांगितला तो एक प्रकार. कोणी काही बोलले की लागले त्याच्यामागे. हजारोंनी माणसं जातील घाणेरड्या ठिकाणी. अहो, इतके पैसे बनवले माताजी. त्याची बायको रजनीशबरोबर पळाली. तिला पैसे वगैरे दिले नसतील कदाचित. आम्ही त्यांनाच मानत होतो. मग माना. आम्ही त्यांना मानतो म्हणजे तुम्ही आहात कोण? नम्रतेला इथून सुरूवात करायची. मी कोण? मी सहजयोगी. आत्मा स्वरूपतत्व प्राप्त झालेला मी सहजयोगी आणि मला कसे वागले पाहिजे. अहो, ज्ञानेश्वरांचे उदाहरण समोर आहे. तुकारामांचे उदाहरण समोर आहे. रामदासांचे उदाहरण समोर आहे. एकनाथांचे. ते नाही ऐकलं का तुम्ही? ते नाही पाहिलं का? ज्या नामदेवाला गुरू नानकांनी आपल्या ह्रदयाशी लावलं तो नामदेव महाराष्ट्रातील शिंपी होता ना! पण या नामदेवाच्या देवळात जाऊन बघितलं टाळ कुटत बसलेत. मोजून दहा शिंपी जरी आले तरी म्हणायचं नामदेवांचं काही तरी साधलं. आज त्या सर्व संत-साधूंना परत एकच विनंती, परत या देशात जन्म घेऊन सर्वांना ठीक करा.

सहजयोगाची जी प्रगती व्हायला पाहिजे ती वाढलेली नाही. फक्त सहजयोग मात्र वाढत चाललाय. म्हणजे जे जास्त पसरतं ना, म्हणजे त्याच्यात जर ताकद नसली तर ते फाटतं. तर आता हा ग्रुप वेगळा, तो ग्रुप वेगळा. तिकडे हे ऐकायला मिळत नाही. ही भांडणं तिथे दिसतच नाही मुळी. अहो, सहजयोगात प्रत्येकाचा वेगवेगळा ग्रुप कसला? स्वयं साक्षात कार्तिकियाने तिथे जन्म घेतलाय. तिला, सरस्वतीलासुद्धा 'स्कंध माता' म्हणतात. ती त्याची आई नव्हती. ती कुमारी होती पण स्कंधाला आपल्या ह्रदयाशी लावून ठेवले होते आणि त्याला मुलगा मानले होते. त्या कार्तिकियाने शोधून या महाराष्ट्रात जन्म घ्यावा. ज्ञानेश्वरांनी जे काही लिहिले आहे त्याच्यावर सारे जग भाळले आहे, पण आपल्या इथे मात्र उलट प्रकार.

सांगायचे म्हणजे की अमेरिकेतून काहीजण आले ते इथे एक युनिव्हर्सिटी बनवायची म्हणून. 'पीस युनिव्हर्सिटी'. आळंदीला होणार. पण झाले काय? आळंदीला तर करणार नाहीत ते. माझ्या चरणी आले आणि म्हणाले,'माताजी, तुम्हीच सगळं करा. तुमच्याच हवाली. आम्हाला इकडे महाराष्ट्रात कुणाकडून, काहीही करवून घ्यायचे नाही. We don't want to deal with them. झालं काय, एका शिष्टाने-मोठी आहेत माणसं ती, त्यांनी अडीच कोटी मारले त्यांचे. बिचाऱ्या त्या अमेरिकन्सचे. दुसऱ्याने साडे तीन कोटी मारले. त्यांनी काढता पाय घेतला. 'नको रे बाबा या महाराष्ट्रात.' मला सांगितले,'तुम्हीच करा, तुमच्या नावाने करा. आम्ही तुम्हालाच मानतो.' माझी त्यांची भेट दोन तासांची. ते थक्कच पडले काय लोक आहेत! आणि व्यवस्थित चालू आहे आणि ज्यांनी पैसे मारले ते काही राजकारणी नाहीत. जो दिसला तो पैशावरच झडप.

हे सगळे सांगण्याचे कारण असे की गहनता येण्यासाठी आधी स्वत:ला बघायला पाहिजे. स्वत:कडे लक्ष द्या आणि बघितलं पाहिजे माताजींनी सांगितले ते किती माझ्यात आहे. मी सगळ्यांना सांगते की कुंडलिनीचे जागरण होते तर सगळ्या व्याधी, सगळ्या प्रकारच्या उपाधी गळून जातात. सर्व काही सुटून एक सुंदर कमळाचं फूल येतं. पण महाराष्ट्रात आल्यावर तसे दिसत नाही. परत सगळ्यात मोठा मुद्दा म्हणजे मला यात कोणता हुद्दा मिळाला? हा लिडर कोण? हा सांगणारा कोण? हा कशाला मला येऊन ठीक करतो? मी लिडर मानत नाही मग त्याच्याविरूद्ध लिहा, चरित्राबद्दल लिहा. 'माताजी, तुम्ही आम्हाला सहजयोगातून काढलं, पण ज्याच्यामुळे काढले त्याचे चरित्रच ठीक नाही.' मला अक्कल आहे किंवा नाही. तुमच्या अकलेने मी चालले असते तर काय झाले असते.

सगळ्यात जास्त म्हणजे कर्मकांडी फार आहोत आपण. सकाळी चार वाजता उठायचं. आंघोळ करायची, माताजींच्या समोर ध्यानाला बसायचं. मग मी इतकं करूनही माझं भलं का नाही होत? बाई, ह्रदय पाहिजे. ह्रदय कुठे दिलयंस तु मला. तुझं ह्रदय दे मला. तुझं ह्रदय मिळाल्याशिवाय मी त्याच्यात भरू तरी काय? प्रेम भरायला ह्रदय पाहिजे. भांडकुदळ लोकांना ह्रदय असते असे मला नाही वाटत.

तेंव्हा आजच्या पूजेत एवढं सगळं सांगितले ते एवढ्यासाठी जसे तुम्ही इथे दिवे लावलेत. मराठीत तो शब्द असा की 'दिवे लावू नका.' मराठी भाषा अशी आहे की तलवारीसारखी. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की, हृदयात दिवा लावा. तो लावला की तुम्हाला स्वत: बद्दल कळेल. आमच्या लहानपणी आमची आई म्हणायची, 'लक्ष कुठे आहे?' काही असलं की लक्ष कुठेय? आता त्याचा अर्थ मला कळतो. तुमचं लक्ष कुठेय? तुमचं लक्ष काय?

संथपणा, रागीटपणा, चिडणं, चिडचिडणे, काहीतरी नवीनच काढणे हा सर्व प्रकार सहजयोगात चालणार नाही. कसे मनुष्याला शांत चित्त पाहिजे. त्याच्यावर वर्णन अमृतानुभवात सुद्धा वा! वा! वाचलं की वाटतं कसं ज्ञानेश्वरांनी समजावून सांगितले लोकांना. पण आहेत कुठे समजायला. त्यांना काही कळतचं नाही काय लिहिलंय ते. तेंव्हा अमृतानुभव घ्या. पारायण करू नका. त्यातील एकेका शब्दाला बघा. त्याच्यात ही स्थिती आहे. कसा सहजयोगी आपल्यात समाधानाने सामावलेला, मजेत आलेला. त्याला सत्ता नको, पैसे नको, काही नको. कसा तो मजेत आलेला. तो कसा आनंदात आलेला. त्याचं व्यक्तित्व म्हणजे काहीतरी विशेष.

सहजयोगात महाराष्ट्रात मात्र आहेत काही तासलेले हिरे. उत्तम, अति उत्तम. पण ते आणि बाकीचे असेच वाटतात मला. पण आपापसात हेवेदावे करणे, मला कुणीही पत्रं लिहू नये आणि त्यात दुसऱ्यांची निंदा करू नये. मला आवडत नाही ते. मला सोडा ते कुणालाही आवडत नाही आणि त्याचे परिणाम होतील. कृपा करून मला घाणेरडी पत्रं लिहू नका. तुमच्या मते ती फार चांगली असतील. ती स्वत:जवळच ठेवा. मला काही सांगायची गरज नाही. मला सगळे माहिती आहे. फक्त तुम्हाला माहिती असले तरच, तुमच्यातून हिरे-माणके निघणार आहेत. ती खाण आहे आणि खाणीत जरी कोळसा दिसला तरी त्या कोळशात हिरे-माणके आहेत. इतकी वर्षे झाली आता मेहनत घेतली. आता तुम्ही जर स्वत:ला ओळखलं नाही तर मी काय करू? ज्ञानेशांचे जे आयुष्य होते ते इतके महत्त्वाचे आयुष्य तेवीस वर्षांचे. त्यांनी कसे घालवले असेल. सन्याशाच्या पोटी मुद्दामहून जन्माला आले. मुद्दामहून. लोकांना दाखवायला हे सगळं वरचं, औपचारिक काहीच नाही. औपचारिकता, वरचे सगळे सोंग आहे. त्या सर्वांच्या विरोधात ते जन्माला आले आणि सोंगाड्या लोकांनी त्रास दिला त्यांना. तसं सहजयोगात ठेऊ नका. माताजींबद्दल एवढं लक्षात ठेवा. मला सगळ्यांबद्दल सगळं माहिती आहे. मला काहीही सांगायला नको, फक्त तुम्ही स्वत:ला मात्र ओळखा. मला ओळखण्यापेक्षा जर स्वत:ला ओळखाल तर आजची पूजा धन्य झाली असं मी म्हणेन याबद्दल शंका नाही.

उत्तर हिंदुस्थानात मात्र कार्य खरोखरच जोरात सुरू झाले. याबद्दल शंका नाही आणि तिथल्या आय.ए.एस. ऑफिसर्स नी आपापसात एक संघ तयार केला की जर कोणी currupt असेल, कोणीही ऑफीसर, कितीही मोठा असला तरी त्याच्याबद्दल आपण कारवाई करायची. सगळा मागमूस काढायचा, काय झालं? कसे पैसे कमावतो? कुठून पैसे कमावतो? आणि मग त्याला कोर्टात घालायचं. मी त्यांना म्हटलं, ''तुम्ही आले कसे सहजयोगात आय.ए.एस.ची मंडळी?' 'अहो माताजी, त्रास असा आहे, आम्ही लोक ईमानदार आहोत. आम्हाला बेईमानी करताच येत नाही.' ऐका तुम्ही. माझे यजमानही तसेच. मला माहितीये. माझा जावई तसाच. आम्हाला बेईमानी करताच येत नाही. 'आम्ही करायचं काय?



मला

ओळखण्यापेक्षा


जर स्वत:ला

ओळखाल तर

आजची पूजा

धन्य झाली

असं मी म्हणेन .



लोकांबरोबर रहायचं कसं? ते आम्हाला म्हणतात बेईमानी करा. मग शेवटी आम्हाला मार्ग मिळाला. सहजयोगी झालो आम्ही आणि हे आम्ही सगळे सहजयोगी असे सगळे एकजूट झालो. कुणी भांडत नाही, काही नाही.' तशीच संघटना व्हायला पाहिजे सहजयोग्यांची इथे. आम्ही सत्यावर उभे आहोत आणि आम्हाला कुणीही हलवू शकत नाही. अडीक आम्ही उभे आहोत त्या सत्यावर. पण त्या सत्याचा प्रवाह किंवा त्या सत्याचा प्रकाश प्रेम आहे आणि प्रेम त्याची सोयरिक होती स्पष्ट सांगितले आहे ज्ञानेश्वरांनी. तेच तुमचे नातलग. पण नाही.

आमच्याकडे हळदी-कुंकू आहे. बरं मग? माझ्या काकू येणार आहेत त्या अमक्या देवाला मानतात, त्या येणार आहेत त्या तमक्या देवाला मानतात. सगळ्या साळकाया-माळकाया येणार आहेत. सहजयोगी येणार आहेत. तुमचे नातलग कोण? हेच. हे तुमचे भाईबंद आहेत. यांच्याविरूद्ध त्यांच्याशी भांडण करण्यापेक्षा स्वत:शीच भांडण करा. या सबंध जगात आज एक जीव एकवटलेला आहे सहजयोगात. ज्याला मी सामूहिकता म्हणते ती जागरूक झाली आहे. ६५ देशातून त्याचा निनाद मी ऐकते आहे, पण महाराष्ट्रात तसे दिसत नाही. एकजूट झाले पाहिजे. काही असले तरी आम्ही सहजयोगी आहोत आणि बाकी सगळे दुसरे आहेत आणि हे जोपर्यंत तुमच्यात येणार नाही तोपर्यंत तुम्ही सहजयोगात उतरणार नाही, तोपर्यंत तुम्ही सामूहिक नाही. तुम्ही सामूहिक झाल्याशिवाय हे कार्य होणार नाही.

समुद्राकडे लक्ष दिले तर दिसेल एक जर लहर चालली तर ती सबंध समुद्रात फिरते. कारण समुद्र सामूहिक. सगळे बिंदू एकत्र आहेत. एखादा बिंदू बाहेर पडला तर उन्हाच्या तापाने तो नष्ट होतो. तसेच आपले सहजयोगाचे आहे. सहजयोगात जो आहे तो पूर्णपणे आहे, नाही तर नाही. एक दुसऱ्या विरूद्ध बोलणे, एक दुसऱ्याच्या उखाळ्या-पाखाळ्या काढणे हे शोभत नाही.

आज पूजेच्या दिवशी आपले हृदय स्वच्छ करा व त्या हृदयात प्रेम गंगा वाहू द्या. महाराष्ट्राचा शिष्टपणा बंद झाला पाहिजे.मला माताजींना भेटलचं पाहिजे. माताजींना निरोप करा. मुळीच नाही. मला भेटायचे असेल तर तुम्ही फक्त आपल्या हृदयात मला बघा. तिथेच भेटणार आहे मी तुम्हाला आणि हे फार जास्त आहे. प्रतिष्ठानला आलं की भडीमार. सगळी मंडळी हजर. आम्हाला भेटलच पाहिजे. मी कुणीतरी विशेष. मी डॉक्टर आहे. असाल! असाल! मी वकील आहे. मी अमका, मी तमका आहे. अहो, मी चीफ मिनिस्टरचा चपराशी आहे. अहंकाराचे प्रकार असे जितके महाराष्ट्रात दिसतील तितके कुठे दिसणार नाही. तेंव्हा तो आपल्याला चिकटायला नको. यासाठी तुम्हाला महाराष्ट्रीयन म्हणावे लागेल यासाठी तुम्ही महाराष्ट्रीयन आहात. या महाराष्ट्रात जन्मलेले तुम्ही महान आहात. ते अशा चिखलात का? समोरासमोर करणे, सारखे पुढे येणे. मंडळी आलेली आहेत इथे यातले लिडर कोण तुम्ही ओळखणार नाही. ते त्याच्यात नाहीच आहे कारण नम्रतेने सहजयोगी होता येते हे त्यांना माहीत आहे.

आजच्या पूजेत मी तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद देते. तुम्ही स्वत:च्या आत्म्याच्या अनुभूतीने परिपूर्ण व्हा. अर्धवटपणा नको. परिपूर्ण व्हा, हा आशीर्वाद तुम्हाला देते !



# विशेष उत्तरदायित्व (अनुवादित)

**६-७ फेब्रुवारी १९९०,**

**चैतन्य लहरी १९९०, भाग २, खण्ड १, २**

सहज योगामुळे शारीरिक, मानसिक, भौतिक लाभ तर होतोच परन्तु सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे यामुळे आध्यात्मिक प्रगती ही होते. आपणच आपले गुरू होतो आणि आपण सक्षमही होतो तसेच आपण याआधी सोडू शकत नसलेल्या सगळ्या वाईट सवयी आपोआपच सुटू लागतात. आपल्यावर नियंत्रण येते आणि चक्र पूर्णपणे उघडायला सुरुवात होते. आपल्या स्वभावात दया, प्रेम दिसू लागते. चेहऱ्यावर तेज येते. विचार करण्याचा दृष्टिकोन आणि जीवनाचे मूल्य बदलते. आपण निरर्थक विचार करण्याचे सोडून आनंद सागरात राहू लागतो. आपला संबंध परम चैतन्याशी असल्याने परम चैतन्यच आपल्या साऱ्या दिनक्रमांचा सांभाळ करतात आणि आपल्याला आशीर्वाद देतात. आपल्याला याचा अनुभव येऊ लागतो आणि आपल्याला आश्चर्य वाटू लागते की कशा प्रकारे सगळ्या गोष्टी आपल्या आपणच घडू लागतात. आपण परमेश्वराच्या जगात आलेले आहोत जो अत्यंत जागरूक, निपूण तसेच प्रेमळ आहे आणि तो आपले इतके पालन करतो ज्यामुळे आपण आश्चर्यचकित होतो की माझा इतका सन्मान आणि माझ्यात इतकी शक्ती कुठून आली? हे सगळे आपल्या मध्येच आहे आणि आपल्याला ते मिळवायचे आहे व आपले आणि इतर सर्वांचे जीवन आनंदी बनवायचे आहे. असे झाल्याशिवाय जगात बदल होणार नाही. आपण विशेष लोक आहात ज्यांनी या धरतीवर जन्म घेतला आहे. आपल्यावर या संपूर्ण जगाविषयी एक जबाबदारी आहे त्यासाठी आपण हा क्षण मिळवा आणि यामध्ये स्वत: ला स्थापन करा. आज ही वेळ आली आहे जेंव्हा हे घडायलाच हवे आहे.

# तुम्ही क्षमा केली पाहिजे (ईस्टर पूजा)

**प्राईड हॉटेल, २३ मार्च २००८, अनुवादित**



नमस्कार, आज जे या ठिकाणी पूजेसाठी उपस्थित आहेत, मला माहीत नाही तुम्ही या ठिकाणी कसे येवू शकलात. आजचा दिवस आपल्या सर्वांसाठी खूप महत्त्वाचा आहे. कारण आपल्याला माहीत आहे की कशा प्रकारे येशूचा शेवट झाला. त्यांना सूळावर चढवले गेले आणि त्यांचा मृत्यू झाला.

आपण लोकांनी पण क्षमा केली पाहिजे. असे करणे लोकांना खूप कठीण वाटते आणि मग हा नाराज आहे तर कधी दुसरा नाराज आहे. ते क्षमा करू शकत नाही. मग आपण सहजयोगी असू शकत नाही. सहजयोग्यांनी क्षमा केली पाहिजे. हे खूप महत्त्वाचे आहे कारण यांची हीच शक्ती आहे की जी आम्हाला प्राप्त झाली आहे ती म्हणजे 'क्षमा करणे.'

माणूस चुका करतो. हा त्यांच्या जीवनाचा एक भाग आहे. परंतु सहजयोगी ह्या नात्याने आपण समजून घेतले पाहिजे की आपल्याला क्षमा करायची आहे. जे रागापेक्षाही जास्त महत्त्वपूर्ण आहे. म्हणून जी व्यक्ती चुका करते ती आपल्या म्हणण्यानुसार किंवा परमेश्वराच्या दृष्टीने तरीही आपण त्याला क्षमा कली पाहिजे. क्षमा हा गुण इतका महान आणि आनंददायक आहे की तुम्ही आश्चर्यचकित व्हाल. जर तुम्ही लोकांना माफ कराल तर तुम्ही अत्यंत शुद्ध व्हाल. कारण तुमच्या आत जी घाण, जो राग आहे तो बाहेर निघून जाईल. म्हणून **क्षमा करणे हे मनुष्याचे सर्वात मोठे वरदान आहे.** म्हणून येशू ही हेच म्हणत होते की, 'मी त्यांना क्षमा करतो कारण त्यांना माहीत नाही की ते काय करत आहेत.' जर येशूंचे असेच म्हणणे असेल तर तुमचे काय? आम्ही सर्वसाधारण मनुष्य आहोत आणि जर आम्ही चुका केल्याच तर लोक रागावतील आणि नाराज होतील. परंतु तुमच्यासाठी सगळ्यात चांगली गोष्ट आहे ती म्हणजे क्षमा करणे.

ज्याला आपण क्षमा करू शकत नाही अशांनाही क्षमा करा. हा येशूचा मोठा गुण होता की त्यांना माहीत होते की कशा प्रकारे क्षमा केली पाहिजे. त्यांनी अशांना क्षमा केली की ज्यांनी भयंकर चुका केल्या होत्या, तरीपण त्यांनी क्षमा केली कारण ते त्यांच्यावर प्रेम करीत होते. आणि हेच आम्हालाही करायचे आहे ते म्हणजे क्षमा.

आज त्यासाठी विशेष दिवस आहे. एक विशेष दिवस, क्षमा करण्यासाठी आणि म्हणूनच मी ही सांगितलेले आहे, की तुम्ही विचार करा. खूप उशीर झालेला आहे, परंतु आम्हांला भेटायचे होते कारण मला वेळ घालवायचा नव्हता. क्षमा असे लोक करू शकतात की जे खूप उदार आहेत, चांगल्या हृदयाचे आहेत. जसे प्रत्येकजण चुका करतो तसेच आम्ही पण चुका करू शकतो आणि याचा अर्थ असा आम्हाला क्षमा करण्याचा अधिकार आहे आणि क्षमा करण्यासाठी हृदय आहे. जर आपल्याजवळ ते नसेल तर तुम्ही सहजयोगी नाही. तुम्हाला क्षमा करणे हे शिकले पाहिजे आणि ते ही कुठलीही अपेक्षा न ठेवता.



आजचा दिवस खूप विशेष असा आहे कारण येशूनेही हेच केले होते. तुम्ही म्हणू शकता की ते जास्त शक्तिशाली देवता होते. सगळ्यात जास्त शक्तिशाली. ते काहीही करू शकत होते. ते सर्वांना त्यांच्या वाईट वर्तणुकीबद्दल शिक्षा देवू शकत होते. परंतु त्यांनी काय सांगितले, 'मी क्षमा करतो' आणि त्यांनी परमेश्वरालाही सांगितले की 'त्यांना क्षमा कर.' म्हणून आपल्याकडे ज्या शक्ती आहेत, तुमच्या आयुष्यात तुम्ही जे जे प्राप्त केलेले आहे, मग तुम्ही कोणतेही पदाधिकारी असाल, तरीही तुम्ही शिकले पाहिजे की कशाप्रकारे क्षमा केली पाहिजे नाहीतर तुम्ही तुमच्या जीवनात काहीच करू शकणार नाही. तुम्हाला क्षमा करणे हे शिकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा एक खूप मोठा गुण आहे. जर तुम्ही क्षमा करू शकत असाल तर प्रत्येक क्षणी क्षमा करा.

आणि म्हणूनच मला आज तुम्हाला सर्वांना भेटायचे होते आणि सांगायचे होते की आजचा दिवस 'क्षमे' चा आहे. याचा अर्थ असा नाही की तुम्ही बसून विचार करू लागा की किती लोकांना क्षमा करायची आहे? तो मूर्खपणा होईल. परंतु कधी कधी काही गोष्टींचा तुम्हाला त्रास होतो. आणि तुम्ही विचार करू लागता की तुम्हाला त्रास दिला गेला आहे आणि अडचणीत टाकलेले आहे.

असेच ते विचार करीत राहतात परंतु त्यांना माहीत नाही की किती शक्ती आहेत आणि एवढ्या शक्ती असूनही ते क्षमा करू शकत नाही आणि सगळ्यात महान शक्ती ही आहे की तुमच्यात क्षमा करण्याची शक्ती आहे.

आजचा दिवस क्षमेचा आहे. अशा लोकांना क्षमा करायची आहे की ज्यांनी तुमच्या दृष्टीने चूक केली किंवा तुमच्या बाबतीत जे लोक त्रासदायक असतील. कृपया आठवण्याचा प्रयत्न करा की तुम्ही अजून किती लोकांवर नाराज आहात, त्यांना क्षमा करा. तुम्ही त्यांना हृदयापासून माफ केले तर असे केल्यावरच त्यांना त्यांची शिक्षा मिळेल. समजा तुम्ही त्यांना शिक्षा दिलीत. तुम्ही त्यांना ते परत केले जे त्यांच्यासाठी योग्य होते किंवा त्यांना तेच पाहिजे होते म्हणून ही फार अवघड गोष्ट नाही - क्षमा करणे. परंतु लोक विचार करतात की खूप कठीण आहे माफ करणे कारण त्यांना असे वाटत असते की ते खूप महान आहेत. आणि विचार करतात की कशाप्रकारे ते क्षमा करू शकतात.

मला माहीत नाही की कोणत्या गोष्टींचा तुम्हाला त्रास होतो. कशाचाही तुम्हाला त्रास होवू शकतो. शेवटी तुम्ही आत्म साक्षात्कारी

आम्हाला आमची शक्ती हा विचार करण्यात खर्च करायची नाही की काय चूक आहे, त्याने काय केले आणि तुम्हाला काय करायचे आहे.

आहात. तुम्ही पुर्नजन्म प्राप्त केला आहे. तुम्ही विशेष लोक आहात. म्हणून तुमच्यात एक विशेष गुण पाहिजे तो म्हणजे क्षमा करणे. क्षमा करणे आणि हे आठवू नका की कोणत्या गोष्टींमुळे तुम्ही नाराज आहात, कोणत्या गोष्टींमुळे त्रस्त. बस, फक्त आठवा की कोणत्या गोष्टींसाठी क्षमा करायची आहे.

बस, फक्त क्षमा करा. कशासाठी? ही खूप साधी गोष्ट आहे. समजा की तुम्हाला कोणी थप्पड मारली. ठीक आहे.जर कोणी मला थप्पड मारली तर मला काय केले पाहिजे? काय मला पण त्याला थप्पड मारली पाहिजे? नाही. तर मी त्याला विचारले पाहिजे की तुम्ही मला थप्पड का मारली? नाही. मग मी असा विचार करेन की तो नासमज, मूर्ख होता म्हणून त्याने असे केले. हे पण काहीच कामाचे नाही. यापेक्षा तुम्ही क्षमा करू शकलात तर क्षमा करा अशा व्यक्तीला ज्याने काही चूक केली आहे. तुमच्यासाठी हेच महत्त्वपूर्ण आहे की त्याला क्षमा करा कारण त्याचा कोणताही परिणाम होणार नाही. एक वेळ तुम्ही क्षमा केलीत तर त्याचा तुमच्यावर, तुमच्या चांगुलपणावर किंवा पवित्रतेवर कोणताही परिणाम होणार नाही. परंतु मला वाटते की मनुष्याला सर्वसामान्यपणे क्षमा करणे मोठे कठीण वाटते.

परंतु तुम्ही सगळे आत्मसाक्षात्कारी आहात, तुम्ही फक्त साधारण मनुष्य नाही म्हणून मी तुम्हाला विनंती करते की तुम्ही हे लक्षात ठेवा की तुमच्याजवळ क्षमा करण्याची शक्ती आहे. अशा प्रत्येक व्यक्तीला क्षमा करा ज्याने तुम्हाला जखम दिली आहे, ज्याने तुम्हाला त्रास दिलेला आहे, ज्याने तुम्हाला दु:ख दिलेले आहे. आपण किती दूरपर्यंत जाऊ शकतो? फक्त त्याला क्षमा करण्याचा विचार करा आणि मग तुम्हीच आश्चर्यचकित व्हाल की तो परिवर्तीत झालेला असेल. त्याच्यात परिवर्तन होईल. आपण स्वत: ही समाधानी व्हाल. हे समजून घेणे लोकांच्या दृष्टीने खूप कठीण कार्य आहे. परंतु तुम्ही फक्त प्रयत्न करा. मी जे सांगते ते तुम्ही फक्त प्रयत्न करून पहा. जर कोणी तुमचे नुकसान करीत असेल तर त्याला फक्त क्षमा करा आणि प्रतिक्रिया पाहा तुमची व त्या व्यक्तीची. पहा काय होते. परंतु जर तुम्ही नाराजी आणि मूर्खता आणि जे पण असेल त्याचे ओझे उचलणार असाल तर तुम्ही अनावश्यक गोष्टींखाली दबून जाल.

आम्हाला आमची शक्ती हा विचार करण्यात खर्च करायची नाही की काय चूक आहे, त्याने काय केले आणि तुम्हाला काय करायचे आहे. हे सगळे आम्हाला करायचे नाही. त्याला एकट्याला सोडून द्या, तुम्ही फक्त क्षमा करा आणि म्हणा 'मी क्षमा केली.'

यानंतर येशूकडे बघा, इतकी शक्तिशाली व्यक्ती, इतका शक्तिशाली परमेश्वर आणि जेंव्हा त्यांना सुळावर चढवले गेले तेंव्हा पण त्यानी त्या लोकांसाठी क्षमा मागितली. त्यांनी असे का केले? कारण त्यांच्यात शक्ती आहे. मी क्षमा केली असे म्हणणे फारच प्रभावशाली असते. यात आपण आपली शक्ती हरवत नाही तर त्या शक्तीला एका उंचीवर पोहचवतो व आपण ही वैयक्तिकरीत्या एका उंचीवर पोहचाल. बस, क्षमा करा. फक्त असच 'मी क्षमा केली' असे म्हणणे खूप सोपे आहे.

हीच माझी पद्धत आहे. कारण लोकांच्या आपल्या अनेक पद्धती असतात. त्यांना पाहिजे तसे ते करतात. पण मला त्या गोष्टींवर कधी राग येत नाही. मी त्या गोष्टींबद्दल नाराज होत नाही आणि मला त्या गोष्टींची पर्वाही नाही. मी फक्त म्हणेन 'मी



क्षमा केली' बस. आणि आपल्याला आश्चर्य वाटेल खरोखरच यामुळे मला खूपच मदत झाली.

म्हणून हा एक मोठा असा गुण आहे. ज्यासाठी आजचा दिवस खूप महत्त्वपूर्ण आहे. सुळावर येशूने म्हटले 'हे परमेश्वरा, त्यांना क्षमा कर कारण त्यांना माहीत नाही की ते काय करीत आहेत.' सुळावर जेथे त्यांचा शेवट होत होता त्याठिकाणी त्यांनी असे म्हटले आणि त्यातूनच आम्हाला शिकायचे आहे - क्षमा करणे.

हे आपल्यासाठी आहे दुसऱ्यांसाठी नाही.. यामुळे आम्हाला मदत होईल जर तुम्ही क्षमा केली तर तो तुमच्यासाठी खूप उपयुक्त संदेश आहे. हा संदेश आज आणि नेहमीसाठी आहे. नेहमीच जेंव्हा तुम्हाला कुणाचा राग येईल तेंव्हा फक्त म्हणा, 'मी त्यांना क्षमा केली.' तुम्ही पहाल की कोणी तुम्हाला दु:ख देत असेल किंवा त्रास देत असेल किंवा नुकसान पोहचवत असेल तर तुमची प्रतिक्रिया काय होईल? फक्त क्षमा करा, क्षमा करा. फक्त हाच एक मार्ग आहे.

म्हणून आजचा दिवस आमच्यासाठी खूप महत्त्वपूर्ण दिवस आहे. मला खूप आनंद होत आहे की तुम्ही हे सगळे ऐकत आहात आणि मी तुमच्यासमोर बोलत आहे.

**धन्यवाद!**



# श्री भैरवनाथ पूजा

## (अनुवादित)

**६ ऑगस्ट १९८९, कारलेट, इटली**

आज आम्ही श्री भैरवनाथांची पूजा करण्यासाठी एकत्रित झालो आहोत. माझ्या विचारानुसार आम्ही श्री भैरवनाथ जे इडा नाडीवर आहेत आणि वर-खाली विहार करतात त्यांचे महत्त्व समजलेले नाही. ईडा नाडी चंद्र नाडी आहे. म्हणून हा स्वत:ला शांत करण्याचा मार्ग आहे आणि श्री भैरवनाथांचे महत्त्व आम्हाला शांत करणे आहे. उदा.अहंकार आणि ह्रदयातील गरमी आमच्या क्रोधाचे कारण आहे. जेंव्हा मनुष्य अत्यंत रागात असतो तेंव्हा श्री भैरवनाथ त्याला दुर्बल करण्यासाठी एक खेळी खेळतात. ते श्री हनुमानाच्या मदतीने त्या रागावलेल्या मनुष्यास ह्या सत्याची जाणीव करून देतात की क्रोध करण्यासारखा मूर्खपणा करण्यात काही चांगले नाही.

एक डाव्या बाजुची व्यक्ती सामूहिक होऊ शकत नाही. एका उदास, अप्रसन्न किंवा चिंताग्रस्त व्यक्तीला सामूहिकतेचा आनंद घेणे कठीण आहे. जसे एक क्रोधी, राजसी व्यक्ती दुसऱ्याला सामूहिकतेचा आनंद घेवू देत नाही. परंतु स्वत: सामूहिकतेत राहण्याचा प्रयत्न करतो की ज्यामुळे त्याचे उत्थान होईल. अशा व्यक्तीला केवळ आपली श्रेष्ठताच दाखवायची असते. म्हणून तोही सामूहिकतेचा आनंद घेवू शकत नाही.

याशिवाय जी व्यक्ती प्रत्येक वेळी निराश असते व विचार करते की माझ्यावर कोणी प्रेम करीत नाही, कोणी माझी काळजी घेत नाही आणि जो प्रत्येक वेळी दुसऱ्यांकडून अपेक्षा करतो तो पण सामूहिकतेचा आनंद घेवू शकत नाही. अशा प्रकारे डाव्या बाजूकडील व्यक्ती प्रत्येक गोष्टींमुळे उदास होतात. प्रत्येक गोष्ट अशुभ समजण्याचा नकारात्मक प्रवृत्तीमुळे आपण आपल्या उजव्या बाजुला हानी पोहचवतो.

श्री भैरवनाथ आपल्या हातात प्रकाशाचा दिवा घेवून ईडा नाडीमधे वर-खाली संचार करून आपल्यासाठी मार्ग प्रकाशित करतात. ज्यामुळे आपण पाहू शकाल की नकारात्मक काहीच नाही. नकारात्मकता आमच्यात अनेक प्रकारे येते. एक नकारात्मक तत्त्व आहे की 'हे माझे आहे', 'माझे मूल', 'माझा पती', 'माझी संपत्ती' अशा प्रकारे एक वेळ जेंव्हा तुम्ही ह्या गोष्टींमध्ये मग्न होता तेंव्हा तुमच्या मुलांमध्ये ही नकारात्मक तत्त्व येतात. परंतु जर तुम्ही सकारात्मक होणार असाल तर हे सोपे आहे, यासाठी तुम्हाला पाहिले

पाहिजे की तुमचे चित्त कोठे आहे? **'प्रत्येक नकारात्मकतेमधुनच सकारात्मकतेचा आनंद घेणे' ही एक सहजयोग्यांची क्षमता आहे.** नकारात्मकतेचे कोणतेही अस्तित्व नाही. जर प्रत्येक वस्तू सर्वव्याप्त शक्ती मात्र आहे तर अज्ञानतेचे अस्तित्व कसे असू शकेल? परंतु जर तुम्ही ह्या शक्तीतच हरवलात किंवा त्यापासून दूर पळालात तर तुम्ही म्हणाल की नकारात्मकता आहे. ज्याप्रकारे तुम्ही स्वत:ला एका गुहेत लपवले आणि गुहा चांगल्या प्रकारे बंद केली व म्हणालात, 'सूर्य नाही'. जे लोक सामूहिक होऊ शकत नाही ते डाव्या बाजूचे असतील किंवा उजव्या बाजूचे. डाव्या बाजूचे लोक नकारात्मक वृत्तीमध्ये सामूहिक असू शकतात जसे दारुड्या लोकांची सामूहिकता - शेवटी ते वेडेपणा पर्यंत पोहोचतात. तसेच उजव्या बाजूचे लोक मूर्ख होतात.

जर एक सहजयोगी सामूहिक होवू शकत नाही तर त्याने हे समजून घेतले पाहिजे की तो सहजयोगी नाही. भैरवनाथ आम्हाला अंधारात प्रकाश प्रदान करतात. कारण ते आमच्यातील भूत आणि भूतांच्या विचारांचा नाश करतात. श्री भैरवनाथ श्री गणेशाशी पण संबंधित आहेत. श्री गणेश मूलाधार चक्रावर विराजमान आहेत आणि श्री भैरवनाथ डाव्या बाजूकडे जाऊन उजव्या बाजूकडे जातात. म्हणून प्रत्येक प्रकारची बंधने आणि सवयींवर श्री भैरवनाथांच्या मदतीने विजय मिळवता येतो. नेपाळमध्ये श्री भैरवांची एक खूप मोठी स्वयंभू मुर्ती आहे. तिकडे लोक जास्त डाव्या बाजूचे आहेत म्हणून ते श्री भैरवांना घाबरतात. जर कोणाला चोरी करण्याची वाईट सवय असेल तर ती सोडण्यासाठी श्री भैरवनाथांसमोर दिवा जाळा आणि त्यांच्यासमोर आपला अपराध स्वीकारा व ह्या वाईट सवयींपासून मुक्त होण्यासाठी त्यांची मदत घ्या. अयोग्य किंवा धूर्ततापूर्ण कार्य करण्यापासून श्री भैरवनाथ आमचे रक्षण करतात. जे कार्य आम्ही खूप गुप्त रूपाने करतो ते पण श्री भैरवांपासून लपले जाऊ शकत नाही. जर तुम्ही तुमच्यात परिवर्तन आणले तर ते तुमच्या वाईटपणाचे भांडे उघडे पाडतात. अशा प्रकारे त्यांनी सगळ्या भयानक तसेच खोट्या गुरूंचे भांडे उघडे पाडले आहे.

नंतर श्री भैरवनाथांचे अवतरण ह्या पृथ्वीवर श्री महावीरांच्या रूपात झाले. ते नरकाच्या प्रवेशद्वारावर थांबतात कारण लोकांना नरकात जाण्यापासून वाचवता यावे परंतु जर तुमची नरकात जाण्याचीच इच्छा असेल तर ते थांबवत नाही. चांगले आहे जर तुम्ही तुमच्या नकारात्मकतेबरोबर लढण्याचा प्रयत्न कराल. तसेच दुसऱ्यांची सोबत आवडणारे, दुसऱ्यांवर प्रेम करणारे तसेच सर्वांना आवडतील असे लोक बना. दुसरे तुमच्यासाठी काय करतात याची चिंता न करता तुम्ही केवळ हाच विचार करा की तुम्ही काय भले करू शकता. या आपण श्री भैरवनाथांना प्रार्थना करू की ते आम्हाला हास्य, आनंद, चैतन्य प्रदान करोत.



# गुरूपूजा



आज आपण गुरू तत्त्वाची महानता समजून घेणार आहोत. गुरू आपल्यासाठी काय करतो हे पाहू या. तुमच्यामध्ये जे काही ऐश्वर्य जन्मापासून सिद्ध करून ठेवले आहे त्याचे ज्ञान गुरू आपल्याला करून देतो. तसे पाहिले तर ते ज्ञान, ही आध्यात्मिक संपत्ती, हा आनंदाचा ठेवा तुमच्या अंतर्यामी, तुमच्याजवळच आहे. फक्त तुम्ही त्याला विसरून गेलेले असल्यामुळे गुरू तुम्हाला त्याची पुन्हा ओळख करून देतो आणि तुमच्या स्वरुपाची जाणीव करून देतो. प्रत्येक मानव प्राण्यामध्ये आत्म्याचा वास आतमध्ये आहेच आहे, जन्मापासून आहे, पण अज्ञानी असल्यामुळे तुम्ही तुमच्यातील हा अमोल ठेवा जाणत नाही. गुरू तुम्हाला त्याची ओळख व जाणीव करून देईपर्यंत तुम्ही मायेमध्ये अडकून बसल्याचे तुम्हाला समजत नाही. गुरूकडूनच हा आत्मप्रकाश तुम्हाला मिळू शकतो. काहींना हा प्रकाश लख्खपणे मिळतो तर काहींना कमी प्रमाणात. जगामधील सर्व धर्मांचे सार तत्त्व हेच आहे की, प्रत्येक मानवाने आपले स्व-रुप जाणले पाहिजे. धर्माच्या नावाखाली झगडे करणाऱ्यांना नेमकी हीच गोष्ट समजत नाही. प्रत्येक धर्माचा हाच पायाभूत विचार असला तरी सर्वसाधारण लोकांना अजूनही वाटते की, देवपूजा, व्रत इत्यादी कर्मकांड पाळल्यावर ते देवाजवळ जाऊ शकतील. म्हणून ते आपल्या खऱ्या स्वरुपाबद्दल अज्ञानी असल्यामुळे नसत्या गोष्टींमध्ये अडकून जातात. मग त्यांना वाटू लागते की, सर्व काही पैशावरच अवलंबून आहे आणि पैसा मिळविण्यातच त्यांना धन्यता वाटते. खरे तर त्यांच्या या भोळेपणाचा फायदा घेणाऱ्यांचे त्यामुळे फावते. त्यासाठी ते तुमच्या अहंकाराला खत-पाणी घालतात आणि या मोहमायेच्या जाळ्यात अडकूनही तुम्ही स्वतःला धार्मिक समजता. पण याला धार्मिकपणा म्हणत नाही.

कबेला , २३ जुलै २०००

गुरूचे वागणे प्रेममय व करुणामय असले पाहिजे. दुसरा माणूस राग येण्यासारखा वागला तरी गुरूने राग दाखवता कामा नये; राग प्रगट झाला की दुसऱ्याच्या मनातही राग येतो. सहजयोगामध्ये आल्यावर प्रेमामधूनच सर्व प्रश्न सोडवायचे असतात. त्यासाठी आपल्यामधील पाशवी प्रवृत्ती कशा कमी होतील इकडे सहजयोग्यांनी लक्ष दिले पाहिजे. उदा.सापाला कुणी इजा केली तर तो डंख मारतो किंवा वाघाला कुणी त्रास दिला तर तो चवताळून येतो. सहजयोग्यांमधील अशा वाईट प्रवृत्ती गेल्या पाहिजेत, गुरू होण्यासाठी तुमचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व शांत, प्रेमळ व करुणायुक्त झाले पाहिजे. माणसांमध्ये कमी-अधिक प्रमाणात जनावरांचे काही



ना काही गुण शिल्लक आहेत हे तुम्ही समजले पाहिजे व दुसऱ्या सहजयोग्यामधील ते दोष प्रेमाने कसे सुधारता येतील इकडे लक्ष दिले पाहिजे. क्षमा केल्यावर दुसरा माणूस त्याच त्याच चुका पुन्हा करत राहील अशी शंका घेण्यचे कारण नाही. कारण क्षमा केली की दुसरी व्यक्ती तुमच्या स्मरणांतूनही जाते. सहजयोगी गुरूसाठी हे फार आवश्यक आहे. पूर्वीच्या काळी अत्यंत तापट स्वभावाचे गुरू अनेक होते. चुका केलेल्या शिष्यांना ते घालवून द्यायचे. अशा वेळी त्यांनी प्रेमशक्तीचा वापर केला असता तर ते सुधारू शकले असते असे मला वाटते.

कबेला, इटली, १ ऑगस्ट १९९९

सहजयोग आता खूपच पसरला असल्यामुळे आपल्याला अशा गुरूंची जरुरी आहे. म्हणून सर्वप्रथम आपला स्वभाव चांगला बनला पाहिजे, सहजयोगी गुरूने तोल सांभाळून वागले पाहिजे. त्याचबरोबर अंत:करणात शुद्ध प्रेम बाळगले पाहिजे. मग तुमचे सगळे प्रश्न, सहजयोगातील अडचणी वगैरे सर्व काही संपून जातील आणि सर्व कार्य सुरळीतपणे होत राहील. गुरू होणे ही मोठी जबाबदारी आहे; गुरूने पण नम्रपणा बाळगून शिष्यांना समजून घेतले पाहिजे. त्यांच्या प्रश्नाकडे सहानुभूतिपूर्वक लक्ष दिले पाहिजे. इतरांच्या मनात त्याच्याबद्दल जराही किंतु येता कामा नये. आज कबेला आश्रमाला दहा वर्षे होत आहेत म्हणून मी तुम्हाला हे सर्व सांगत आहे. सुरुवातीला ही जागा फार अडचणीची, निर्जन, गैरसोयीची आहे असे अनेकांना वाटत होते पण सहजयोगाचा चमत्कार आहे. असे अनेक चमत्कार तुम्ही सहजयोगामध्ये अनुभवले आहेत. सहजयोग्यांना सर्व प्रथम व्हायब्रेशन्स नीट समजली पाहिजेत. ही जागासुद्धा मी व्हायब्रेशन्समुळे निवडली. तुम्ही सर्वांनीही नियमित ध्यान करून आपली दृष्टी व्यापक बनवली पाहिजे. संकल्प स्पष्ट झाले पाहिजेत. त्याचबरोबर आदिशक्ती आपल्या पाठीशी आहे याचे सतत भान ठेवले पाहिजे. मग तुम्हाला काही त्रास होणार

नाही, काही कमी पडणार नाही आणि कार्य घडून येईल. तुमच्या ध्यानामधून व्हायब्रेशन्स पसरत असतात आणि त्याच तुमच्या सर्व कार्यामध्ये व जीवनामध्ये तुम्हाला मदत करत असतात. म्हणून तुम्हाला भांडण, वादविवाद करण्याची जरुरी नाही. ध्यानामधून तुम्ही अशी उच्च स्थिती प्राप्त करून घ्या जिथे तुम्ही प्रेमाच्या महासागरात उतराल.

कबेला, इटली, १ ऑगस्ट १९९९

आता एकविसावे शतक सुरू होणार आहे आणि अनेक घटना घडणार आहेत म्हणून तुम्ही सर्वांनी काय करायचे ते ठरवले पाहिजे. सहजयोगाच्या प्रसारासाठी प्रत्येकाने आपल्याला कुवतीनुसार कार्य केले पाहिजे; त्यांच्यातच तुमचे चित्त घातले पाहिजे. ज्या महिलांना बाहेर जाणे शक्य होत नसेल त्यांनी सहजयोगाबद्दल काहीतरी लेखन करावे, आपले आध्यात्मिक अनुभव लिहावे किंवा आपले अनुभव (फायदे) लिहून काढावे. बऱ्याच जणांना चमत्कारांचे अनुभवही मिळाले आहेत. ते फोटो इकडे पाठवावे म्हणजे जगभरातील या चमत्कारांचे एकत्रित संकलन करता येईल. त्या फोटोंचा अभ्यास करता येईल. तसेच सहजयोगामधील तऱ्हेतऱ्हेचे अनुभव एकत्रित करून त्यांचे संकलन करुन प्रकाशित करण्याचा विचार आहे. त्यासाठीही सर्वांनी आपआपले वैशिष्ट्यपूर्ण असे अनुभव पाठवावे. तसेच चमत्कारांचे अनुभवही पाठवावे म्हणजे त्यांचेही पुस्तकरूपात प्रकाशन करता येईल. हे सर्व मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेतच लिहावे.

मला विश्वास आहे की मी आज सांगितलेल्या गोष्टींवर तुम्ही चिंतन कराल आणि त्यानुसार कार्य कराल.

कबेला, इटली, २२ जुलै १९९८

स्थिर व संतुलित व्यक्तिमत्त्व बनण्यासाठी ध्यान केले पाहिजे. कोण रोज ध्यान करतो व कोण करत नाही हे मला लगेच कळते. तुम्हालासुद्धा ते समजेल. रोज सकाळी व संध्याकाळी ध्यान केल्याने संतुलन सुधारते. प्रतिकारशक्ती बळावते आणि शारीरिक चोचल्यांमध्ये तुमचे चित्त लागत नाही. खाण्यापिण्याचे लाडही सुटतात. काय खायचे, कधी जेवायचे हे विचारपण डोक्यात येईनासे होतात. शिवाय तुमच्या व्यक्तिमत्त्वातही एक प्रकारचा गोडवा येतो व तुमच्याकडे पहाणारा प्रसन्न होतो. मॉडेलचे अनुकरण लोक करतात तसे तुमच्या सारखे व्यक्तिमत्त्व व्हावे असे इतरांना वाटू लागते. म्हणजेच तुम्ही गुरू बनता. त्याचबरोबर या डाव्या उजव्या बाजूकडे गेल्याने येणारे दोष किंवा सवयी पण सुटतात. जे लोक सत्त्वगुणी असतात त्यांना नीतिधर्माबद्दल आदर असतो. अशा लोकांना अनितीमान लोकांचा तिरस्कार असतो; कालांतराने त्यांची वृत्ती लोकांपासून दूर राहण्याची बनते आणि नंतर हिमालयासारख्या एकांतवासात राहणे पसंत करतात. समाजापासून संबंध तोडून दूर जातात आणि एखाद्या महान गुरूसारखे व्हायला बघतात. अशा लोकांचा काही उपयोग नसतो. मी हरिद्वारला गेले होते तेंव्हा अशा काही जणांना भेटले होते तेव्हा त्यांना त्याबद्दल विचारले तर ते माणसे नकोशी वाटतात असे म्हणाले. त्यांच्या मते लोकांना कितीही सांगितले तरी ते ऐकत नाहीत आणि उलट त्रासच देतात. अशा लोकांचा काय उपयोग शंभर वर्षांहूनही जास्त ते जगले तरी त्यांचा समाजाला काय उपयोग? ते मलाच म्हणायचे,''माताजी, तुम्ही आई असल्यामुळे लोकांचा त्रास सहन करता पण आम्हाला ते जमायचे नाही.'' त्यांच्याजवळ अनेक शक्त्या असतात पण सर्वसाधारण माणसांना ठीक करता येईल अशी शक्ती नसते. मी त्यांना सांगितले की माणसांना सुधारण्याचा मार्ग म्हणजे त्यांना आत्मसाक्षात्कार देणे हाच आहे; म्हणजे आत्म्याच्या प्रकाशामध्ये माणसांना आपण कुठे चुकतो हे कळेल, आपण काय विसरलो आहोत हे त्यांना कळेल; हे आरशात स्वत:कडे बघण्यासारखे आहे आणि मगच लोक स्वत:ला सुधारू शकतील व उन्नत होतील.

कबेला, इटली, २२ जुलै १९९८

# प्रश्नोत्तरे

**प्रश्न १ : - गुरुची व्याख्या काय आहे?**

- गुरुला आपल्या शिष्याचे भले करणे व धर्मपरायणतेची जबाबदारी एक आईसारखी घ्यावी लागते. गुरु तो की जो आपल्या शिष्याला ब्रह्मचैतन्याबरोबर जोडतो. तुम्ही त्यांना विकत घेऊ शकत नाही. जर तुम्ही गुरुला विकत घ्याल तर तो तुमचा सेवक होईल, गुरु रहाणार नाही.

**प्रश्न २ : - राजयोग, भक्तीयोग, जपयोग व सहजयोगात काय अंतर आहे?**

-आधुनिक राजयोग म्हणजे इंधनाशिवाय गाडीची चाके चालवण्यासारखे आहे. राजयोग सहजयोगातच समाविष्ट आहे. ज्याप्रमाणे अन्न खाल्यानंतर पचनक्रिया आपोआपच कार्यरत होते. त्याप्रमाणे जेंव्हा कुंडलिनी जागृत होते तेंव्हा तुम्ही स्वत: परमेश्वराशी जोडले जाता. जेंव्हा तुम्ही परमेश्वराच्या साम्राज्यात होता तेंव्हा परमेश्वराचे नाव एकदाच घेणे पुरेसे आहे. सारखे सारखे परमेश्वराच्या नावाचा जप करुन असे समजू नका की परमेश्वर तुमच्या खिशात आहे (उन्मुक्त हास्य) भक्ती दोन प्रकारची असते. पहिली म्हणजे आंधळी भक्ती, दुसरी - जागृत भक्ती अर्थात सहजयोग. परमेश्वराशी जोडल्याशिवाय भक्ती करणे व्यर्थ आहे. ती संबंध न जोडता फोन करण्यासारखी आहे. श्रीकृष्णाच्या सांगण्यानुसार ही अनन्य भक्ती झाली पाहिजे. अर्थात यासारखे अन्य कोणी असू शकत नाही.

**प्रश्न ३ : - सगळ्या नद्या कोठे न कोठे समुद्राला मिळतात, आम्हाला कसे समजेल की आम्ही केंव्हा पोहोचणार?**

- मी विचार करते की तुम्ही तुमच्या प्रवासाच्या उद्दिष्टापर्यंत पोहोचलेले आहात. जर तुम्ही विचार करीत असाल की तुम्ही पोहोचलेले नाहीत तर चांगले आहे. तुम्ही परत जा आणि मग परत यात्रा करुन येथे पोहोचा. (उन्मुक्त हास्य)

**प्रश्न ४ : - गीतेचा उपदेश अर्जुनाला दिला गेला होता. परंतु त्यांचा आदेश सार्वभौमिक आहे का?**

- सगळ्या ग्रंथाचा उपदेश मानवजातीसाठी असतो. हा फक्त शद्वापर्यंत मर्यादित नाही परंतु आपल्याला त्यांनुसार वागण्यात आहे. एक स्थितप्रज्ञ (जागृत आत्मा) तसेच गीतेचा अभ्यासक किंवा उपदेश करणारा यांच्यात इतके अंतर का आहे? कारण तुम्हाला एक 'स्थितप्रज्ञ' बनायचे आहे. त्या कार्यासाठीच मी आले आहे.

**प्रश्न ५ : - शिक्षणाच्या संदर्भात ?**

- उच्च शिक्षण घेणेच पुरेसे नाही निर्णय क्षमतेचा (Discretion) पण प्रयोग केला पाहिजे.

**प्रश्न ६ : - ध्यान करणे म्हणजे संमोहन आहे का?**

- संमोहनात मानवीय चेतना नसते. सहजयोगात मनुष्याची चेतना जागृत व विस्तृत असते. ती असीम होते. संमोहनात तुमचे डोळे उघडे असतात. ज्यामुळे तुम्ही अचेतन अवस्थेत जाता परंतु सहजयोगात ध्यान करतेवेळी तुमचे डोळे बंद असतात. त्यामुळे त्यांचा प्रयोग संमोहनासाठी केला जात नाही.

**प्रश्न ७ : - महाराष्ट्रात दुष्काळ का? ही एक योगभूमी असूनही असे का?**

- कारण येथील लोकांनी साखरेबरोबरच दारू बनवणे सुरु केलेले आहे. जे योग भूमीत राहतात त्यांना हे ज्ञान पाहिजे की ते काय करीत आहेत. जे या योगभूमीत जन्माला आहे त्यांची मोठी जबाबदारी आहे की आत्मजागृती प्राप्त करणे.

# नव आगमन

## NEW RELEASES

### SPEECH ACD'S & ACS

| | | CODE |
|---|---|---|
| **HINDI** | | |
| 01) सात चक्र | - 22nd Mar' 1979 | 027 |
| 02) पाने के बाद | - 24th Mar' 1979 | 264 |
| 03) सार्वजनिक कार्यक्रम | - 09th Jan' 1979 | 356 |
| 04) मकर सन्क्रांती पूजा | - 14th Jan' 1979 | 357 |
| 05) मकर सन्क्रांती सेमीनार | - 15th Jan' 1979 | 358 |
| 06) चक्रोपर उपस्थित देवता भाग १ और २ | - 17th Jan' 1979 | 359 |
| 07) सार्वजनिक कार्यक्रम भाग १ और २ | - 13th Mar' 1979 | 360 |
| 08) विशुद्धी चक्र भाग १ और २ | - 16th Mar' 1979 | 361 |
| 09) दो संस्थाऍ - मन और बुद्धि | - 29th Jan' 1980 | 362 |
| 12) सार्वजनिक कार्यक्रम | - 13th Dec' 1980 | 365 |
| 13) सार्वजनिक कार्यक्रम | - 23rd Dec' 1987 | 366 |
| **MARATHI** | | |
| 10) सहज सेमीनार - भाग १ | - 09th Dec' 1980 | 363 |
| 11) सहज सेमीनार भाग १ और २ | - 10th Dec' 1980 | 364 |

### BHAJAN ACD/ACS

| | | CODE |
|---|---|---|
| 1) NIRMAL SANGEET | - Meena Phatarpekar | 129 |
| 2) SAHAJ KI RAAH PAR | - Baba Mama | 130 |
| 3) SHAHNAI RECITAL | - Ustad Bismillah Khan | 131 |
| 4) VOCAL RECITAL | - Jayteerth Mevundi | 132 |
| 5) SAHAJ KRANTI KI NIRMAL BHAKTI | - Dhananjay Dhaumal | 133 |

### TELUGU BHAJAN ACD

| | | CODE |
|---|---|---|
| 1) AMRUT VARSHINI | - Pt. B. Subramanian | 134 |
| 2) PUJA (TELUGU BHAJANS) | - Pt. B. Subramanian | 135 |







## BOOKS RELEASE

| NAME | RATE |
|---|---|
| 1) The Advent | 200/- |

| TELUGU BOOKS | RATE |
|---|---|
| 1) Nirmalanjali | 100/- |
| 2) Face of God | 150/- |

## NEW RELEASES

### DVD'S

| | | CODE |
|---|---|---|
| 01) Navratri Celebrations 2007 | - 12th Oct' 2007 | 195 |
| 02) Makar Sankaranti Puja | - 17th Jan' 2008 | 196 |
| 03) Shri Ganesh Puja | - 10th Feb' 2008 | 197 |
| 04) 56th Republic Day Celebration | - 26th Jan' 2008 | 198 |
| 05) Christmas Puja | - 23rd Dec' 1981 | 199 |
| 06) Guru Puja | - 04th Jul' 1982 | 200 |
| 07) Shri Ganesha Puja (Part - I & II) | - 22nd Aug' 1982 | 201 |
| 08) Birthday Puja (Part - I & II) | - 17th Mar' 1985 | 202 |
| 09) Shri Devi Puja (Part - I & II) | - 31st May' 1985 | 203 |
| 10) Puja at Brahmapuri | - 27th Dec, 1985 | 204 |
| 11) Mahalakshmi Puja | - 06th Jan' 1986 | 205 |
| 12) Shri Kartikeya Puja | - 13th Jul' 1986 | 206 |
| 13) Diwali Puja (Shri Laxmi Puja) | - 01st Nov' 1986 | 207 |
| 14) Public Program | - 05th May' 1987 | 208 |
| 15) Shri Mahakali Puja | - 16th Oct' 1987 | 209 |
| 16) Sahasrara Puja | - 08th May' 1988 | 210 |
| 17) Shri Ganesha Puja | - 26th Aug' 1990 | 211 |
| 18) Shri Hanuman Puja | - 31st Aug' 1990 | 212 |
| 19) 2nd Public Program | - 06th Dec' 1990 | 213 |
| 20) सार्वजनिक कार्यक्रम, Loni - मराठी | - 10th Dec' 1990 | 214 |
| 21) सार्वजनिक कार्यक्रम, Shrirampur - मराठी | - 11th Dec' 1990 | 215 |
| 22) Mahashivratri Puja (Part - I & II) | - 16th Feb' 1991 | 088 |
| 23) Guru Puja (Part - I & II) | - 28th Jul' 1991 | 216 |
| 24) Christmas Celebrations 2007 (Part - I & II) | - 25th Dec' 2007 | 217 |
| 25) Shri Bhairavnath Puja, Part-I | - 06th Aug' 1989 | 065 |
| 26) Shri Ganesh Puja | - 04th Aug' 1985 | 079 |

**अब आप स्वयं मंगवा सकते है -**
**सहज योग की किताबे, प्रवचन, पेंडेंटस् आदि**
**भारत के किसी भी कोने से !!!**

### ७ सरल विधी आदेश के :-

१) NITL के कॅटलॉग (जो मुफ्त में उपलब्ध किये जा सकते है) के जरिये आप ऑडियो और विडियो प्रवचन, पुस्तके, फोटोग्राफ्स आदि (की फर्माइश करें) को चुनें।

२) आप कॅटलॉग का आवेदन, इ-मेल के जरिये **sales@nitl.co.in** पर कर सकते हैं।

३) अपने आदेश को दूर-ध्वनी, इ-मेल, फॅक्स के जरिये NITL तक पहुँचा सकते हैं।

संपर्क सूचना -

**निर्मल ट्रान्सफॉर्मेशन प्रा. लि.**

प्लॉट नं. ८, चंद्रगुप्त हाउसिंग सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे - ४११ ०३८.
फोन : + ९१-२०-२५२८६५३२, फॅक्स : + ९१-२०-२५२८६७२२

आपकी सुविधा के लिए दो और आदेशों के तरीके (वेबसाईट पेमेंट गेट वे और टोल फ्री नंबर) जल्द ही उपलब्ध किये जानेवाले हैं।

४) निम्नलिखित सूची जल्दही उपलब्ध करवायी जाएगी।
- आपके आदेश (ORDER) का क्रमांक।
- आपके आदेश (ORDER) की कीमत, शिपमेंट खर्च सहित।
- आपके पार्सल को आप तक पहुँचाने का समय।

**जिस आदेश (ORDER) की कीमत रुपये - १०,०००/- से ज्यादा होगी उस पर कोई अतिरिक्त शिपमेंट की रकम लगाई नहीं जाएगी।**

५) **एक्सिस बँक** के हमारे अकाऊंट - **104010100185554** में किसी भी शाखा के द्वारा रकम जमा कर सकते हैं।

६) जमा की गई रकम की आप हमें जानकारी दें।

७) अपने आदेश (ORDER) को सीधे अपने घर पाईये।







जसे कमळ आहे, जे
कोणत्याही घाणेरड्या
अगदी सडलेल्या जागेत
उगवते. आणि या
सर्वांमधून निघून ते
जेंव्हा फुलते तेंव्हा
सुवासिक होते व संपूर्ण
वातावरण सुवासाने भरून
जाते. त्याच प्रकारे
सहजयोगाची विशेषता
आहे. तुम्ही पण त्या
कमळाप्रमाणे आहात.
तसे नसता तर 'सहज'
मध्ये आला नसता.